Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –VI November – December 2024

# इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधन जाणीव जागृती–एक अभ्यास

**मार्गदर्शक**
**डॉ. लता सुभाष मोरे ( सुरवाडे )**
**प्राचार्य, साने गुरुजी विद्याप्रबोधिनी,**
**सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**खिरोदा, ता. रावेर,**
**जि. जळगाव, महाराष्ट्र**

**संशोधक**
**श्री. अमरदीप अशोक रामराजे**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**संशोधन केंद्र - साने गुरुजी विद्याप्रबोधिनी,**
**सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**खिरोदा, ता. रावेर, जि. जळगाव, महाराष्ट्र**

**प्रस्तावना**

आज आपण सध्याच्या युगाला माहिती तंत्रज्ञानाचे युग असे संबोधतो . या माहिती तंत्रज्ञानाचा वापर विविध प्रकारचे कार्य करण्यासाठी उपयोग केला जातो, त्यामुळे कार्य सुलभ व सहजतेने होताना दिसते. शाळेची, समाजाची आणि पर्यायाने देशाची प्रगती ही या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होताना दिसून येते. तंत्रज्ञानाच्या विविध शोधामुळे माहितीचे प्रसारण हे लवकर होतेच पण त्या सोबत आभासी वर्ग तयार होण्यास मदत होते. त्यामुळे आशय चांगल्या प्रकारे सादर करता येतो व त्याचे आकलन व्यवस्थित होते.आज अध्यापनात विविध पारंपरिक अध्यापन साधनासोबतच तंत्रज्ञानात्मक साधनाचा वापर होताना दिसतो याचा उपयोग म्हणजे आशय प्रभावीपणे मांडता येतो.

CC BY *Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

**संशोधनाची गरज व महत्व**

इतिहास विषयातील आशय हा भूतकालीन घटनांशी संबंधित असतो त्यामुळे तो समजून घेणे व त्याचे आकलन परिणामकारक होण्यासाठी अडचणी निर्माण होतात त्यासाटी विविध अध्यापन साधनाचा आधार घ्यावा लागतो यामध्ये पारंपरिक अध्यापन साधने व तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा समावेश होतो पर्नापारिक अध्यापन साधनांमध्ये प्रामुख्याने टाकते, नकाशे , चित्र आदींचा समावेश होतोत परंतु हि साधने ऐतिहासिक आशयाला मूर्त रूप देण्यास काही प्रमाणात असमर्थ ठरतात. यासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचे सहाय्य घ्यावे लागते जेणेकरून आशयाला मूर्त स्वरूप प्राप्त होईल पण हि सर्व साधने शिक्षक किती प्रमाणात वापरतात व कशा प्रकारे वापरतात याचा शोध घेणे आवश्यक ठरले म्हणून सदर संशोधन करणे गरजेचे ठरले.

प्रस्तुत संशोधन हे इतिहास अध्यापनातील तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांच्या जाणीव जागृतीशी असून यामध्ये इतिहास शिक्षक हे अध्यापनात तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा वापर करतात का ? व ते करत असतील तर किती प्रमाणात करतात ? यांचा शोध

घेण्यात आला. तसेच तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा वापर हा विद्यार्थ्यांना आशय किंवा संकल्पना समजून देण्यासाठी कसे उपयुक्त व सहाय्यकारी आहेत हे बघण्यात आले व शिक्षांकामध्ये त्याबद्दल जाणीव जागृती निर्माण केली.

**समस्या विधान**

इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधन जाणीव जागृती –एक अभ्यास

**उद्दिष्टे**

1. इतिहास विषयाच्या अध्यापन साधनांचा शोध घेणे.
2. इतिहास विषयातील तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा शोध घेणे.
3. इतिहास विषयातील तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांची परिणामकारकता अभ्यासणे.
4. इतिहास विषयातील तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांविषयी जाणीव जागृती निर्माण करणे.

**गृहीतके**

1. इतिहास विषयातील अध्यापनात पारंपारिक अध्यापन साधनांचा उपयोग केला जातो.
2. इतिहास विषयाच्या अध्यापनात काही प्रमाणात तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा उपयोग केला जातो.

**परिकल्पना**

**धन परिकल्पना**

इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा वापर केला असता अध्यापन परिणामकारक होते.

**शून्य परिकल्पना**

इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा वापर केला असता अध्यापन परिणामकारक होत नाही.

**कार्यात्मक व्याख्या**

1. इतिहास विषय
   महाराष्ट्र शासनाने शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केलेला एक विषय म्हणजे इतिहास विषय होय.
2. अध्यापन
   आशयाचे आकलन चांगले व सुलभ होण्यासाठी मार्गदर्शक ठरणारी कृती म्हणजे अध्यापन होय
3. तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधणे
   आशय किंवा संकल्पना समजून सांगण्यासाठी सहाय्यभूत ठरणारी तंत्रज्ञानाधारित साधने म्हणजे तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधणे होय.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती**

1. संशोधन हे तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांशी संबंधित आहे.
2. संशोधन हेइतिहास विषयाशी संबंधित आहे.
3. संशोधन नाशिक जिल्ह्याशी संबंधित आहे.

**मर्यादा**

1. संशोधन हे मराठी माध्यमाच्या शाळांशी संबंधित असेल.
2. संशोधन नाशिक शहराशी संबंधित आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे2024-2025या शैक्षणिक वर्षापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधनाची चले**

**स्वाश्रयी चल-**इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधन.

**आश्रयी चल-** तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांची परिणामकारकता.

**संशोधन पद्धती -** संशोधनासाठी सर्वेक्षण व प्रायोगिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाचा नमुना**

संशोधनासाठी नाशिक शहरातील इतिहास विषय अध्यापन करणाऱ्या 469 शिक्षकांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली आहे तसेच मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने**

संशोधनासाठी प्रश्नावली , मुलाखत व संपादणूक चाचणी यांचा वापर करण्यात आला आहे.

**संख्याशास्त्रीय साधने**

संशोधनासाठी शेकडेवारी , मध्यमान, प्रमाण विचलन व ‘t’ परीक्षिका या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधन हे इतिहास विषयाच्या अध्यापनासाठी तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांच्या जाणीव जागृतीशी संबंधित आहे. त्यामुळे इतिहास विषय अध्यापन तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनाचा शोध घेनाय्त आला तसेच इतिहास शिक्षकांची मुलाखत घेऊन तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनाबद्दल मत जाणून घेतले व ते तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधने वापरतात कि नाही याचा शोध घेतला तसेच प्रश्नावली च्या माध्यमातून असे लक्षात आले कि 47 % शिक्षक हे तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनांचा उपयोग करतात तर 53 % शिक्षक अजूनही पारंपारिक अध्यापन साधनाद्वारे अध्यापन करतात.

तसेच तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधनाच्या परिणामकारकता तपासण्यासाठी शाळेतील 30 विद्यार्थ्यांवर प्रयोग करण्यात आला यामध्ये असा निष्कर्ष आला कि, तंत्रज्ञानात्मक अध्यापन साधने हे आशय आकलणासाठी प्रभावी आहेत.

**संदर्भ सूची**

1. अलोणी अर्चना (2009 ), शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन , नागपूर : पिंपळापुरे अँडपब्लिकेशन्स
2. येवले, सीमा (2011), शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान, पुणे: नित्यनूतन प्रकाशन
3. Mishra, R. C (2014), Teaching of Information Technology, Delhi: APH Publishing Corporation